महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक: डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/मा.तं. दिनांक: ८ जुलै २०२२

## -: प्रसिद्धीपत्रक :-

**विषय**:- महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा २०२१-संयुक्त पेपर १ च्या प्रवेशप्रमाणपत्राबाबत

दिनांक १७ जुलै २०२२ रोजी आयोजित महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा २०२१-पोलीस उपनिरीक्षक पेपर क्रमांक २ या परीक्षेची प्रवेश प्रमाणपत्र प्रसिद्ध करण्यासाठीची तांत्रिक कार्यवाही सुरू असण्याच्या दरम्यान आज सायंकाळी ५ ते ८.३० या कालावधीत दिनांक ९ जुलै २०२२ रोजीच्या परीक्षेची प्रवेश प्रमाणपत्र डाऊनलोड करणाऱ्या एकूण ६३ उमेदवारांना त्यांच्या खात्यात दोन वेगवेगळया उपकेंद्राची प्रवेश प्रमाणपत्र दिसत असल्याने त्यांचा गोंधळ उडाला असल्याची बाब समोर आली. यास्तव दिनांक १७ जुलै २०२२ रोजीच्या परीक्षेची प्रवेश प्रमाणपत्र प्रसिद्ध करण्याची कार्यवाही तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. सद्यस्थितीत उमेदवारांच्या खात्यामध्ये केवळ उद्याच्या परीक्षेची प्रवेश प्रमाणपत्र ठेवण्यात आली आहेत. तसेच, उपरोक्त ६३ उमेदवारांसह सर्व उमेदवारांमध्ये प्रवेशप्रमाणपत्राबाबत संभ्रम राहू नये, याकरीता त्यांचे प्रवेशप्रमाणपत्र त्यांच्या नोंदणीकृत ईमेल आयडीवरही उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

२. आज उपरोक्त नमूद कालावधीत प्रवेश प्रमाणपत्र डाऊनलोड करणाऱ्या उमेदवारांव्यतिरिक्त इतर उमेदवारांनी डाऊनलोड केलेल्या प्रवेश प्रमाणपत्रामध्ये कोणतीही त्रुटी नाही.

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग